# जैवविविधता क्षेत्रात भारतीय महिलेची जागतिक झेप

## डॉ. शालिनी ध्यानी यांची एक्स्पर्ट पॅनलवर निवड

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. ७ : जागतिक पर्यावरण आणि जैवविविधता संशोधन क्षेत्रात भारताने महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. निरीच्या डॉ. शालिनी ध्यानी यांची इंटरगव्हर्नमेंटल सायन्स-पॉलिसी प्लॅटफॉर्म ऑन बायोडायव्हर्सिटी अँड इकोसिस्टम (आयपीबीईएस) च्या मल्टिडिसिप्लिनरी एक्स्पर्ट पॅनल (एमईपी) च्या सदस्यपदी निवड झाली आहे. या प्रतिष्ठित पॅनलवर निवडल्या जाणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या आहेत.

सीएसआयआर-राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या (सीएसआयआर-नीरी) वैज्ञानिक-ई आणि सेंटर फॉर इकॉलॉजिकल सिस्टिम्स अँड रेजिलिएन्स डिझाइनच्या प्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. ध्यानी यांचा कार्यकाळ २०२६ ते २०२९ असा तीन वर्षांचा असेल. जैवविविधता व परिसंस्था विषयक जागतिक वैज्ञानिक मूल्यमापनासाठी आयपीबीईएस हे सुमारे



डॉ. शालिनी ध्यानी

१५० देशांचा सहभाग असलेले महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मानले जाते. परिसंस्था संवर्धन, हवामान अनुकूलन, निसर्गाधारित उपाययोजना आणि शाश्वत शहरी विकास या क्षेत्रांमध्ये दोन दशकांहून अधिक संशोधन अनुभव असलेल्या डॉ. ध्यानी यांनी आयपीबीईएसच्या विविध आंतरराष्ट्रीय मूल्यमापन प्रकल्पांमध्येही महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

जागतिक पातळीवर हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास आणि प्रदूषण या त्रिस्तरीय पर्यावरणीय संकटांच्या पार्श्वभूमीवर त्यांची ही निवड भारतासाठी अभिमानास्पद मानली जात आहे.

लोकमत

# नीरीच्या वैज्ञानिक डॉ. शालिनी ध्यानी यांची ऐतिहासिक कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क



**नागपूर** : नीरीच्या वैज्ञानिक डॉ. शालिनी ध्यानी यांनी जागतिक कामगिरी नोंदवली आहे. डॉ. ध्यानी यांची इंटर गव्हर्नमेंटल सायन्स-पॉलिसी प्लॅटफॉर्म ऑन बायोडायव्हर्सिटी अँण्ड इकोसिस्टम सर्व्हिसेस (आयपीबीईएस) च्या मल्टिडिसिप्लिनरी एक्सपर्ट पॅनल (एमईपी) मध्ये निवड झाली आहे. या पॅनलमध्ये निवड होणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या आहेत.

त्यांची निवड युनायटेड किंगडममधील मॅन्चेस्टर येथे आयोजित आयपीबीईएसच्या १२ व्या बैठकीत करण्यात आली. एमईपीमधील त्यांचा कार्यकाळ २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी असणार आहे. २०१२ मध्ये स्थापन झालेल्या आयपीबीईएस आंतरराष्ट्रीय मंचात १५० सदस्य देश सहभागी आहेत. जैवविविधतेबाबत वैज्ञानिक मूल्यांकन उपलब्ध करून देणे हे या संस्थेचे प्रमुख कार्य आहे. एमईपीमध्ये जगातील विविध प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणारे २५ तज्ज्ञ असतात. हे तज्ज्ञ संस्थेच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक कामकाजावर देखरेख ठेवतात. डॉ. शालिनी ध्यानी गेल्या दहा वर्षांपासून आयपीबीईएसशी संलग्न आहेत.

Hello Nagpur
Page No. 2 Mar 09, 2026
Powered by: erelego.com

तरुण भारत
Nagpur Pages | 2026-03-09 | Page- 5
epaper.tarunbharat.net

# डॉ. शालिनी ध्यानी यांची जागतिक जैवविविधता पॅनेलमध्ये निवड



**नागपूर** : सीएसआयआर-राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (सीएसआयआर-नीरी) येथील वैज्ञानिक डॉ. शालिनी ध्यानी यांची इंटरगव्हर्नमेंटल सायन्स-पॉलिसी प्लॅटफॉर्म ऑन बायोडायव्हर्सिटी ॲण्ड इकोसिस्टीम सर्व्हिसेस (आयपीबीईएस) च्या मल्टिडिसिप्लिनरी एक्सपर्ट पॅनेल (एमईपी) सदस्यपदी निवड झाली आहे. मँचेस्टर येथे ३ ते ८ फेब्रुवारीदरम्यान झालेल्या आयपीबीईएसच्या १२व्या अधिवेशनात ही निवड जाहीर करण्यात आली. आयपीबीईएसच्या मल्टिडिसिप्लिनरी एक्सपर्ट पॅनेलमध्ये निवडल्या गेलेल्या डॉ. ध्यानी पहिल्या भारतीय महिला ठरल्या असून, त्यांचा कार्यकाळ २०२६ ते २०२९ असा तीन वर्षांचा असेल. २०१२ मध्ये स्थापन झालेला आयपीबीईएस हा सुमारे १५० सदस्य देशांचा आंतरराष्ट्रीय मंच असून जैवविविधता आणि परिसंस्थांबाबत वैज्ञानिक मूल्यांकन व धोरणात्मक मार्गदर्शन पुरवितो. हवामानविषयक आयपीसीसीप्रमाणेच जैवविविधतेच्या क्षेत्रात आयपीबीईएस महत्त्वाची भूमिका बजावते. सध्या त्या सेंटर फॉर इंटरनॅशनल फॉरेस्ट्री रिसर्च इंडोनेशिया येथे सायंटिस्ट म्हणून कार्यरत आहेत. ◀*(तभा वृत्तसेवा)*.

Powered by Bharati Web

LOKMAT TIMES

# NEERI scientist Dr Dhyani on global biodiversity panel

**Lokmat News Network**
NAGPUR

In a significant recognition for India's scientific community, Dr Shalini Dhyani of CSIR–National Environmental Engineering Research Institute (NEERI) has been elected as a member of the multidisciplinary expert panel of the Intergovernmental Science-Policy Platform on Biodiversity and Ecosystem Services (IPBES).

Dr Dhyani, Scientist-E and head of the Centre for Ecological Systems and Resilience Design at NEERI, was elected during the 12th session of the IPBES plenary held in Manchester, United Kingdom, from February 3 to 8, 2026.

She will serve a three-year term from 2026 to 2029. Her election marks a milestone as she becomes the first Indian woman to be chosen for the prestigious panel. Established in 2012, IPBES is a global body of nearly 150 governments that provides scientific assessments on biodiversity and ecosystems, similar to the role of the Intergovernmental Panel on Climate Change (IPCC) in climate science. The panel comprises 25 leading experts who guide the scientific and technical work of the platform.



Dr Dhyani has been associated with IPBES for more than a decade. She served as lead author for the Asia-Pacific Regional Assessment (2015–2018) and the Thematic Assessment on Sustainable Use of Wild Species (2018–2022). In 2025, she was also selected as Coordinating Lead Author for the IPBES Global Assessment II.

लोकमत समाचार

# नीरी की वैज्ञानिक शालिनी ध्यानी ने रचा इतिहास

## आईपीबीईएस के एमईपी में पहली भारतीय महिला

लोकमत समाचार सेवा

**नागपुर:** अंतरराष्ट्रीय महिला दिवस से पहले भारत की एक महिला वैज्ञानिक ने वैश्विक मंच पर महत्वपूर्ण उपलब्धि हासिल की है. सीएसआईआर-राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान (नीरी) की वैज्ञानिक डॉ. शालिनी ध्यानी इंटरगवर्नमेंटल साइंस-पॉलिसी प्लेटफॉर्म ऑन बायोडायवर्सिटी एंड इकोसिस्टम सर्विसेज (आईपीबीईएस) के मल्टीडिसिप्लिनरी एक्सपर्ट पैनल (एमईपी) में चुनी जाने वाली पहली भारतीय महिला बन गई हैं. उनका निर्वाचन 3 से 8 फरवरी 2026 के बीच मैनचेस्टर (यूनाइटेड किंगडम) में आयोजित आईपीबीईएस की 12वीं पूर्ण बैठक के दौरान हुआ.



डॉ. शालिनी ध्यानी

इस पैनल में उनका कार्यकाल 2026 से 2029 तक रहेगा. वर्ष 2012 में स्थापित आईपीबीईएस लगभग 150 सदस्य देशों वाला अंतरराष्ट्रीय मंच है, जो जैव-विविधता और पारितंत्र सेवाओं पर वैज्ञानिक आकलन उपलब्ध कराता है. इसकी भूमिका जलवायु परिवर्तन के क्षेत्र में कार्यरत इंटरगवर्नमेंटल पैनल ऑन क्लाइमेट चेंज (आईपीसीसी) के समान मानी जाती है. एमईपी में विश्व के विभिन्न क्षेत्रों का प्रतिनिधित्व करने वाले 25 अंतरराष्ट्रीय विशेषज्ञ शामिल होते हैं, जो संगठन के वैज्ञानिक और तकनीकी कार्यों की निगरानी करते हैं.

डॉ. ध्यानी 10 वर्षों से अधिक समय से आईपीबीईएस से जुड़ी हुई हैं. उन्होंने एशिया-पैसिफिक क्षेत्रीय आकलन (2015-2018) व वन्य प्रजातियों के सतत उपयोग पर विषयगत आकलन (2018-2022) में लीड ऑथर के रूप में योगदान दिया. वर्ष 2025 में उन्हें आईपीबीईएस ग्लोबल असेसमेंट-2 के लिए कोऑर्डिनेटिंग लीड ऑथर भी चुना गया. दो दशकों से अधिक के शोध अनुभव के साथ उनका कार्य पारितंत्र संरक्षण, प्रकृति-आधारित समाधान, जलवायु अनुकूलन, आपदा जोखिम न्यूनीकरण और शहरी स्थिरता जैसे विषयों पर केंद्रित है.